महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ७९ वे | दिनांक : १२/०३/२०२६ | वार : गुरूवार

## स्वातंत्र्यवीर सावरकर मानहानी प्रकरणात राहुल गांधींना मोठा दिलासा



**नाशिक :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या कथित मानहानी प्रकरणात काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांना मोठा दिलासा मिळाला आहे. नाशिक न्यायालयाने या प्रकरणातील संपूर्ण कार्यवाही अधिकृतपणे रद्द केली आहे. त्यामुळे या प्रकरणाचा अंतिम निकाल लागल्याचे स्पष्ट झाले आहे. या खटल्यातील सर्व प्रक्रिया संपुष्टात आल्याची माहिती ज्येष्ठ विधिज्ञ जयंत जायभावे यांनी दिली. न्यायालयाच्या या निर्णयामुळे दीर्घकाळ सुरू असलेल्या वादावर आता पडदा पडला आहे.

या प्रकरणाची सुरुवात अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाच्या आदेशापासून झाली होती. सुरुवातीला या न्यायालयाने प्रक्रियेचा आदेश काढला होता. त्या निर्णयाविरोधात राहुल गांधी यांच्या वकिलांनी नाशिक सत्र न्यायालयात फौजदारी पुनरावलोकन अर्ज दाखल केला. या अर्जावर सुनावणी घेतल्यानंतर सत्र न्यायालयाने तो अंशतः मंजूर केला आणि आधीचा प्रक्रिया काढण्याचा आदेश रद्द केला. तसेच अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाला मूळ अर्जावर नव्याने विचार करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

सत्र न्यायालयाच्या निर्देशानंतर अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयात पुन्हा सुनावणी सुरू झाली. या दरम्यान सरकारवाडा पोलिस ठाण्याने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २०२ अंतर्गत अहवाल न्यायालयासमोर सादर केला. पुढील सुनावणीदरम्यान तक्रारदाराने स्वतःहून तक्रार मागे घेण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी श्रीमती नरवाडिया यांनी तक्रारदाराने तक्रार मागे घेतल्याच्या कारणावरून हा खटला निकाली काढण्याचा आदेश दिला. यामुळे या प्रकरणातील सर्व कायदेशीर प्रक्रिया समाप्त झाल्या. दरम्यान, या निर्णयावर प्रतिक्रिया देताना काही कायदेतज्ज्ञांनी आपले मत मांडले. ज्येष्ठ विधिज्ञ जयंत जायभावे यांनी सांगितले की, पुनरावलोकन अर्जावर न्यायालयाने यापूर्वीच निर्णय दिला होता. त्यानंतर झालेल्या चौकशीतही कोणताही ठोस पुरावा किंवा कायदेशीर आधार समोर आला नाही. त्यामुळेच फिर्यादीने तक्रार मागे घेतली असावी, असे त्यांनी स्पष्ट केले. दुसरीकडे आकाश छाजेड यांनी म्हटले की, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना बदनाम करण्यासाठी देशातील विविध भागांत अशा प्रकारचे खटले दाखल केले जातात. मात्र संविधानाच्या चौकटीत चालणाऱ्या देशात अशा प्रकरणांना न्यायालयात फारसा आधार मिळत नाही.

हे प्रकरण राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रेदरम्यान केलेल्या वक्तव्यावरून सुरू झाले होते. त्या वेळी त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी ब्रिटिशांकडे माफी मागितली होती, असे विधान केले होते. या वक्तव्यानंतर सावरकर समर्थकांनी देशातील विविध भागांत राहुल गांधी यांच्या विरोधात खटले दाखल केले होते. नाशिकमध्ये 'निर्भया फाऊंडेशन' या संस्थेच्या माध्यमातूनही एक तक्रार दाखल करण्यात आली होती. या प्रकरणाच्या सुनावणीसाठी राहुल गांधी यांना दोन वेळा न्यायालयात हजर राहावे लागले होते. मात्र अशा खटल्यांना आपण कायदेशीर मार्गाने सामोरे जाऊ, अशी भूमिका त्यांनी यापूर्वी स्पष्ट केली होती. आता तक्रार मागे घेतल्यामुळे हे प्रकरण अखेर संपुष्टात आले आहे.

## जनतेला महागाईच्या खाईत लोटणे कोणत्या धोरणात बसते? अमोल कोल्हेंचा सवाल



**पुणे :** रशिया, युक्रेन आणि इराण-इस्त्रायलमधील युद्धाचे पडसाद उमटतायत खरंय, पण त्या आडून जनतेला महागाईच्या खाईत लोटणे हे कोणत्या धोरणात बसते? असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी उपस्थित केला आहे. सध्या सुरू असलेल्या इराण इस्राइल आणि अमेरिकेच्या युद्धामुळे भारतात अनेक राज्यांमध्ये गॅस टंचाईचा प्रश्न निर्माण झाला आहे. यावर अमोल कोल्हे यांनी ट्विट करत भाष्य केले आहे.

अमोल कोल्हे म्हणाले, माझ्या मतदारसंघातील चाकण MIDC असो वा हडपसर-भोसरीचा पट्टा. आज उद्योगांना ऊर्जेचा आणि इंधनाचा प्रचंड तुटवडा जाणवतोय. अनेक कंपन्या ५० टक्के क्षमतेने चालतायत, तर काहींनी उत्पादने थांबवली आहेत. कामगारांच्या हाताला काम नाही आणि उद्योजकांच्या डोक्यावर चिंतेचे सावट आहे! महाराष्ट्रासह संपूर्ण देशात गॅस पुरवठा खंडित होतोय, हॉटेलं बंद पडतायत, कष्टकऱ्यांचा रोजगार जातोय, आंतरराष्ट्रीय धोरणाच्या नावाखाली इंधन दरवाढ थोपवण्यात सरकार अपयशी ठरलंय. परिणामी, आमच्या शेतकऱ्यांची हक्काची साखर बंदरांवर धूळ खात पडून आहे आणि शेतमाल सडतोय. पण दुर्दैव असं, की देशाची ही आर्थिक कोंडी होत असताना 'विश्वगुरु' असल्याचा डांगोरा पिटणारे सरकार आणि मा. पंतप्रधान मात्र मौन बाळगून असल्याची टीका कोल्हे यांनी केली.

पुढे अमोल कोल्हे म्हणाले, या गंभीर परिस्थितीवर तातडीने तोडगा काढण्यासाठी माननीय खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या मागणीनुसार, सरकारने तात्काळ पार्लमेंटरी जॉइंट कमिटीची बैठक बोलावून यावर सविस्तर चर्चा घडवून आणावी ही आमची आग्रही मागणी आहे. तसेच परराष्ट्र धोरण जर देशांतर्गत सुरक्षा आणि स्वस्त जीवन देऊ शकत नसेल, तर ते धोरण सपशेल फसलेलं आहे, अशी टीका कोल्हे यांनी केली.

माझ्या तमाम जनतेला विनंती आहे की परिस्थिती बिकट आहे, गॅस आणि इंधनाचा वापर अत्यंत जपून करा. संकटाच्या काळात एकमेकांना आधार द्या. सरकार झोपलंय, मात्र आपण जागृत राहूया! असे म्हणत जनतेला आवाहन करत सरकारवर टोला लगावला आहे.

## मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी सरकारची : आरक्षणाच्या प्रश्नावर मनोज जरांगेंचा संताप



**मुंबई :** मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा राज्य सरकार आणि लोकप्रतिनिधींवर टीकेची झोड उठवली आहे. मराठवाड्यासाठी सरकारने काढलेल्या शासन निर्णयानंतर आता मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी सरकारची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जर मराठा समाजाला अपेक्षित प्रमाणपत्र मिळाले नाही, तर २०२९ च्या निवडणुकीत संबंधित आमदारांना पराभवाचा सामना करावा लागेल, असा इशाराही त्यांनी दिला.

लातूर जिल्ह्यातील माकणी थोर येथे आयोजित श्री हनुमान आराधना कार्यक्रमानंतर माध्यमांशी बोलताना जरांगे पाटील यांनी ही भूमिका मांडली. त्यांनी सांगितले की, मराठवाड्यासाठी मराठा आरक्षणासंदर्भात शासन निर्णय जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी आता सरकारवर आहे. जर प्रमाणपत्र मिळत नसेल, तर मराठवाड्यातील नागरिकांनी आपल्या भागातील आमदारांना थेट प्रश्न विचारावा, असे आवाहन त्यांनी समाजाला केले.

जरांगे पाटील यांनी पुढे सांगितले की, मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी जे आमदार पुढे येणार नाहीत, त्यांना २०२९ च्या निवडणुकीत मतदार धडा शिकवतील. प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी सरकार आणि आमदारांनी स्वीकारली पाहिजे. अन्यथा समाज त्यांना निवडणुकीत पाडेल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. मराठा समाजाला न्याय मिळावा यासाठी आंदोलन सुरूच राहील, असेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, समाजाकडून वेळ मागितल्याचा उल्लेख करताना जरांगे म्हणाले की, त्यांनी यापूर्वी समाजाला एक वर्षाचा वेळ देण्याची विनंती केली होती. मात्र सतत विविध कार्यक्रमांमुळे आणि घडामोडींमुळे परिस्थिती बदलत आहे. तरीही समाजाचा माझ्यावर विश्वास आहे आणि माझाही समाजावर पूर्ण विश्वास आहे, असे त्यांनी सांगितले. समाजासाठी काम करायचे असून संघटना उभी करण्यापेक्षा लोकांच्या अडचणी सोडवण्यासाठी कार्यक्षम यंत्रणा उभी करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी त्यांनी काही संवेदनशील मुद्द्यांवरही भाष्य केले. आपल्याविरोधात सुपारी दिल्याच्या चर्चेबाबत सध्या अधिक बोलणार नसल्याचे त्यांनी सांगितले. मात्र या प्रकरणात लवकरच मोठे खुलासे होऊ शकतात, असे संकेत त्यांनी दिले. पोलिसांच्या तपासात अनेक महत्त्वाच्या बाबी समोर येत असल्याचेही त्यांनी नमूद केले. तसेच महादेव मुंडे हत्याप्रकरणाबाबत गृह विभागाच्या कानावर हा विषय टाकल्याचे त्यांनी सांगितले. मराठा समाजाला टप्प्याटप्प्याने आरक्षण मिळेल आणि पुढील एका वर्षात समाज मोठ्या प्रमाणावर आरक्षणाच्या कक्षेत येईल, असा विश्वासही मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १२ मार्च २०२६


## डॉ. सौ. इ. भा. पा. महिला कला महाविद्यालयात एमकेसीएलच्या अधिकृत केंद्राचा शुभारंभ



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इ. भा. पा. महिला कला महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागांतर्गत Maharashtra Knowledge Corporation Limited (एमकेसीएल) च्या अधिकृत केंद्राचा शुभारंभ प्राचार्य डॉ. सुनीता बाजपाई यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानीही प्राचार्य डॉ. सुनीता बाजपाई होत्या.यावेळी वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सुनंदा चक्रनारायण, डॉ. शिवाजी वाघमारे, कार्यालय अधीक्षक सौ. अर्चना कुलकर्णी तसेच श्री. मकरंद जोशी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. शिवाजी वाघमारे यांनी एमकेसीएल केंद्रामार्फत उपलब्ध असलेल्या सुमारे २५७ विविध कोर्सेसची माहिती दिली. या अंतर्गत ३०, ६०, ९० व १२० दिवसांच्या कालावधीचे विविध कौशल्याधारित कोर्सेस उपलब्ध असून विद्यार्थिनींना आधुनिक तांत्रिक व व्यावसायिक कौशल्यांचे प्रशिक्षण मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. सुनीता बाजपाई यांनी विद्यार्थिनींनी या संधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन केले. एमकेसीएल अंतर्गत राबविण्यात येणारे कोर्सेस विद्यार्थिनींच्या कौशल्य विकासासोबतच रोजगाराच्या संधी वाढविण्यास उपयुक्त ठरतील, असे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रितू ठाकूर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. सुनंदा चक्रनारायण, डॉ. शिवाजी वाघमारे, प्रा. दत्तू लहाने, डॉ. सरिता डापके आदींनी परिश्रम घेतले.

शेवटी डॉ. सुनंदा चक्रनारायण यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## कन्नडच्या सभापतीपदी सेनेच्या सुरेखा घुगे, उपसभापतीपदी भाजपच्या माया सुरासे



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड पंचायत समिती निवडणूकीत एकमेकां विरुध्द लढलेल्या शिवसेना-भाजप चे सभापती निवडीत मात्र सूत जुळून, सभापती पदी शिवसेनेच्या सुप्रिया अनिलकुमार घुगे यांची तर उपसभापती पदी भाजपच्या माया सुराशे यांची निवड झाली आहे. त्यामुळे कन्नड पंचायत समितीत महिलाराज आले आहे.जि.प.पं.स. निवडणुकीत शिवसेना भाजप आमने सामने लढले, त्यात ०८ जागा जिंकून पंचायत समितीत शिवसेना बहुमताच्या उंबरठ्यावर पोहचली मात्र बहुमतासाठी केवळ एक आकडा कमी पडला. भाजप ने चार जागा जिंकत दुसरा क्रमांक मिळविला. कांग्रेस न एक जागा जिंकली मात्र कांग्रेस च्या कविता राठोड यांनी नंतर भाजप मध्ये प्रवेश केला. त्यामुळे अप्रत्यक्षरिता भाजप ची सदस्य संख्या पाच झाली. तर कांग्रेस ची सदस्य संख्या शुन्य झाली. राष्ट्रवादी पक्षाने ०१, रायभान जाधव विकास आघाडी ०१ जागा जिंकली. त्यामुळे स्पष्ट बहुमत कोणाला ही मिळविता आले नसले तरी, शिवसेना सत्तेच्या उंबरठ्यावर असल्याने, शिवसेना सभापती पद मिळवेल अशी दाट शक्यता असतानाच भाजप ने ही इतरांच्या मदतीने सभापती पदा साठी रणनिती आखली. उमेदवारांची पळवापळवी टाळण्यासाठी दोन्ही पक्षांनी आपले नवनिर्वाचित सदस्य सुरक्षित ठिकाणी हलविले, अखेर दोन्ही पक्षांनी जुळवून घेत दि.१० मार्च रोजी सभापती पदासाठी झालेल्या बैठकीत, सभापती पदाची माळ शिवसेनेच्या निंभोरा गणांतून विजयी झालेल्या सुप्रिया अनिलकुमार घुगे यांच्या गळ्यात, तर उपसभापती पदी देवगाव रंगारी गणातून विजयी झालेल्या व भाजप तालुकाध्यक्ष ललित सुरासे यांच्या पत्नी माया ललित सुरासे यांच्या गळ्यात टाकण्यात आली. यावेळी नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्यांसह दोन्ही पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.






## श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने "लमाण(बंजारा)" जमातीचे सर्वेक्षण



**उमरगा :** येथील श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभागाच्या वतीने मंगळवार दिनांक १० मार्च रोजी मुळज तांडा येथील लमाण (बंजारा) जमातीच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचे सखोल सर्वेक्षण करण्यात आले. याप्रसंगी डॉ. प्रदीप पाटील आणि डॉ. डी . व्ही. पडोळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी साठ कुटुंबाच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन सामाजिक आणि आर्थिक स्थितीचे अध्ययन केले. या सर्वेक्षणामध्ये स्त्री पुरुष कुटुंब प्रमुखांच्या मुलाखतीतून असे निदर्शनास आले की त्यांच्यात विधवा-विधूरांचे प्रमाण अल्प दिसून आले. तसेच लमाण जमातीत आजही संयुक्त कुटुंब पद्धतीला प्राधान्य, सामान्य जीवन पद्धती,झोपडी आणि कच्ची मातीची घरे, घरकुल योजनेचा लाभ घेणाऱ्यांची संख्या अत्यल्प, गरिबीचे प्रमाण अधिक असून पन्नास हजार रुपयांपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न आणि मजुरीचे प्रमाण अधिक असल्याचे सर्वेक्षणात आढळले. शैक्षणिक स्थिती चिंताजनक आहे. सामाजिक दृष्ट्या या समाजावर धार्मिक सण उत्सव साजरे करण्यावर भर आढळतो. बालविवाह, स्वच्छता आणि आरोग्य बाबत अनास्था आढळून आली. या सर्वेक्षणातून मिळालेल्या निष्कर्षांवर आधारित स्थानिक स्तरावर धोरणे राबविल्यास लमाण समाजाच्या विकासाला गती मिळेल. शिक्षण, आरोग्य, रोजगार, कौशल्य सुधार, शासकीय योजनांबाबत जागृती यावर उपाययोजना केल्यास या समाजाला मुख्य प्रवाहात आणता येईल.असे अभ्यासांती लक्षात आले. सदरील सर्वेक्षणासाठी समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. डी. पाटील, डॉ. डी. व्ही. पडोळे, डॉ. सुमेध राजूरकर यांचे मार्गदर्शन लाभले. महविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय अस्वले, उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, डॉ. पद्माकर पिटले, सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या या उपक्रमाबद्दल अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १२ मार्च २०२६


# दौलताबाद किल्ला परिसरात भीषण आग वनसंपत्ती व वन्यजीव जळून खाक



**दौलताबाद (जावेद अहमद) :** सकाळी दहा वाजेच्या सुमारास किल्ल्याच्या वरच्या भागात दुर्गा तोप व बारदारी ,गणपती मंदिर आदी परिसरात आचानक आग लागलीआग लागल्याने किल्ला परिसरातील गवत झाडे जळून खाक झाली आहेत सकाळी सुमारास अचानक आग लागल्याने ही आग आटोक्यात आणण्यासाठी किल्ल्यातील सहायक संरक्षक संजय रोहनकर,रवींद्र घाटे, सीताराम धनाईत, संजय घुसळे, योगेश जाधव,संतोष जाधव,हमीद शेख,अफरोज सय्यद ,किशोर बोडखे यांनी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला प्रयत्न विफल ठरले व वरचे परिसर पूर्ण जळून खाक झाले दुर्घटनेमध्ये कुठलीही जीवित हानी झाली नसली तरी नेहमीच लागत असलेल्या या आगीमुळे छोटे पक्षी ,जीव आणि झाडे वनस्पतींचे मोठे नुकसान होत आहे मागील घटना पाहून पुरातत्व विभागाने या वर्षी साडे सात हार्स पॉवर च्या कॅनव्हास चा 1000 फुटाचे पाईप टाकले आहे यात संत जनार्दन स्वामी च्या गृहे जवळ असलेल्या पाण्याच्या टाकी,खंदक ,सरस्वती विहीर, कचेरी विहीर या ठिकाणी टाकले आहेजनार्धन स्वामी गुहेच्याजवळ असलेल्या टाक्या तुन पाणी घेऊन मारा करण्यात आला पण हा मारा हजार फुटा पर्यंत जाते त्यामुळे परत आग लागली व परिसर जळून खाक झाले मागील वर्षी बारदारी ला आग लागली होती ती यंदा वाचवता आलीआग किल्ल्यात आत लागल्यास पुरातत्व विभागाकडे आग विजवण्यासाठी पुरेशी यंत्रणा उपलब्ध नाहीअग्निशमन दलाचे वाहन आत मध्ये जाऊ शकत नाही दरवर्षी किल्ला व परिसरात आगीच्या घटना घडत असतात त्यामुळे मोठे नुकसान होते.

सकाळी गेलेल्या जवळपास दीडशे पर्यटकांना सुरक्षित बाहेर काढून दुपारी बारा वाजेपासून पर्यटकांना प्रवेश बंद करण्यात आले होतेकिल्ला न पाहताच अनेक देशविदेशातील पर्यटकांना माघारी फिरावं लागलेआंध्रप्रदेश, रत्नागिरी, मुंगैर बिहार चे दिलीपकुमार व कुटुंब,ओडिशा चे अनमोल व मित्र,बंगलोर चे नायर व मित्र असे अनेक पर्यटकांची हिरमोड झाली आहेपोलीस निरीक्षक रेखा लोंढे व कर्मचारी आणि महसूल अधिकारी सूरज गिरी,भाजप चे अल्पसंख्याक जिल्हा महामंत्री शेख बने यांनी किल्ल्यावर भेट देऊन पाहणी केली.

# आत्मविश्वास, कठीण परिश्रम व दृढ निश्चयाच्या बळावर यश संपादन करता येते - उपजिल्हाधिकारी दत्तात्रेय शेजूळ




**पिंपळनेर :** विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास अंगी बाळगून, कठीण परिश्रम करून व दृढ निश्चयाच्या बळावर यश संपादन करावे असे प्रतिपादन नाशिक येथील उपजिल्हाधिकारी दत्तात्रेय शेजुळ यांनी केले.पिंपळनेर येथील कर्म.आ.मा.पाटील कला,वाणिज्य व कै.अण्णासाहेब एन.के.पाटील विज्ञान महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर नाशिकचे उपजिल्हाधिकारी दत्तात्रय शेजुळ, पिंपळनेर नगर परिषदेचे मुख्याधिकारी दीपक पाटील, संस्थेचे अध्यक्ष आर.एन.शिंदे,उपाध्यक्ष जयेश मराठे, संस्थेचे सचिव ए. एस.बिरारीस, संचालक एच.आर.गांगुर्डे, डॉ.विवेकानंद शिंदे, महादेव शेजुळ, प्राचार्य एस.डी.पाटील, राजेंद्र गवळी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.लहू पवार, सेवानिवृत्त प्राचार्य ए. बी. मराठे, प्राचार्य पी. एच. पाटील आदी व्यासपीठावर उपस्थित होते. नाशिकचे उपजिल्हाधिकारी दत्तात्रय शेजुळ यांनी सांगितले की जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर कठीण परिस्थितीवर मात करून यश संपादन करता येते.स्वप्नांचा पाठपुरावा करण्यासाठी कठोर परिश्रम, दृढनिश्चय आणि संकटांशी लढण्याची तयारी असेल, तर यश आपल्यापर्यंत आपोआप चालून आल्याशिवाय राहणार नाही, म्हणून वाळूचे कण रगडीता तेलही गळे या उक्तीने काम करा आणि आपलं ध्येय गाठा असे मौलिक मार्गदर्शन त्यांनी केले.यावेळी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दीपक पाटील म्हणाले की,"लाथ मारीन तिथं पाणी काढीन" असे वय आणि आत्मविश्वास तुमच्या अंगी आहे. म्हणून पदवी मिळवताना पाच सहा वर्ष चांगला अभ्यास करा, यशाला नक्कीच गवसणी घालणार आणि संपूर्ण आयुष्यभर आरामात जीवन जगणार असे प्रतिपादन मुख्याधिकारी दीपक पाटील यांनी केले. दीपक पाटील पुढे म्हणाले की योग्य दिशेने प्रयत्न करा निश्चितच चांगले दिवस आल्याशिवाय राहणार नाहीत. त्यांनी विविध खेळाडूंची इच्छाशक्ती आणि कमावलेले यश याविषयी उदाहरण देऊन मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना आर. एन .शिंदे म्हणाले की ज्यांना जो छंद आहे, त्यांनी त्याच्यात करिअर करा. आपल्याला आयुष्यात काय व्हायचे आहे हे आधीच ठरवून त्या दिशेने पाऊल टाकत यश मिळविण्याचा प्रयत्न करा. चांगले संस्कार अंगीकारा आपल्या आई-वडिलांसह कुटुंबाचे गावाचे राष्ट्राचे नाव मोठे कसे करता येईल यासाठी प्रयत्न करा. महाराजा सयाजीराव गायकवाड यांची बालपणीची गोष्ट सांगून सर्व विद्यार्थ्यांना अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या. वर्षभर शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, सामाजिक उपक्रमात यश संपादन केलेल्या 12 प्राध्यापकांना आणि 128 विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमधून शैक्षणिक गुणवत्ता जनरल चॅम्पियन आयेशा अनिस अहमद, मुलांमधून जिमखाना जनरल चॅम्पियन राहुल संजय भवरे, मुलींमधून जिमखाना जनरल चॅम्पियन म्हणून महिमा किसन देसाई, यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. महाविद्यालयाच्या विविध विभागांमधील प्राध्यापकांनी व विद्यार्थ्यांनी जे नैपुण्य मिळवले त्याबद्दल चा आलेख सांगून महाविद्यालयाच्या गुणवत्तेविषयीचा अहवाल वाचन स्नेहसंमेलन प्रमुख व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ लहू पवार यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन , बक्षीस वाचन प्रा.डॉ.सतीश मस्के, डॉ.संजय खोडके, प्रा.सी.एन.घरटे, डॉ.आनंद खरात यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. डॉ. सतीश मस्के यांनी मानले. राष्ट्रगीत व वंदे मातरम ने कार्यक्रमाची सांगता झाली.

# बदललं आहे गाव

गावातील माणसांमध्ये आधी
नात्यागोत्यात होता मेळ.
आपुलकीने भेटण्यासाठी,
संध्याकाळची होती वेळ.

जागतिकीकरणानंतर म्हणे
गावात बदल झाला राव
आधुनिकतेच्या नावाखाली
बदलला आहे माझं गाव.

सोयी सुविधा कमीच होत्या
माणसा माणसात होता लळा
सोयी सुविधा हाती लागता
ओस पडला माणुसकीचा
मळा.

गल्लोगल्ली पोरांचा घोळका
खेळताना दिसत होता राव
मित्र मित्रांच्या अडचणीत
न सांगताच घेत होता धाव.

सोयी सुविधा आल्यापासून
जगण्यात बदल झाला खूप.
बर्गर पिझ्झाच्या नादी लागून,
मुलांनी विसरले दही दूध तूप.

करलो दुनिया मुठ्ठी मे म्हणत,
विश्वात गुंतून राहिला गाव.
मोबाईल हाती आल्यापासून,
शेजाऱ्याचेच विसरला नाव.

बदललेलं चित्र पाहून आज
खरंच वाटतं बदललं आहे गाव
सोयी सुविधा संपत्ती
असूनसुद्धा
माणुसकीला मिळत नाही भाव.



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए
मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क
9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १२ मार्च २०२६


## बीड ग्रंथोत्सव-२०२६ समन्वय समितीची बैठक संपन्न

**बीड (भगवंत पाळवदे) :** महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण - २०१० अंतर्गत उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, बीड आयोजित बीड ग्रंथोत्सव-२०२५ च्या समन्वय समितीची बैठक दि.११ मार्च २०२६ रोजी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, बीड येथे सहाय्यक ग्रंथालय संचालक छत्रपती संभाजीनगर सुनिल हुसे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीला शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. बीड प्रियाराणी पाटील, श्रीकृष्ण डोईफोडे, प्रतिनिधी, जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, बीड, सुधीर चाटे, अध्यक्ष, बीड जिल्हा ग्रंथालय संघ व संजय शा.मस्के जिल्हा ग्रंथालय अधिकारी, बीड हे उपस्थित होते. सर्वप्रथम या बैठकीतील उपस्थित सदस्यांचे श्री.संजय शा.मस्के, जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांनी ग्रंथभेट देवून स्वागत केले.

या बैठकीमध्ये ग्रंथोत्सव -२०२५ चे आयोजन व त्यामध्ये घेण्यात येणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रम यावर चर्चा होवून ग्रथोत्सव-२०२५ चे आयोजन दि.२७ व २८ मार्च २०२६ रोजी र.भ.अटल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय , गेवराई येथे करण्याचे सर्वानुमते ठरवण्यात आले. बैठकीच्या शेवटी बा.पा. पठाण, वरिष्ठ लिपिक यांनी उपस्थित सदस्यांचे आभार मानले.

## वर्ल्ड चॅम्पियन स्पर्धेत केहाळाच्या जिल्हा परिषद केंद्रीय शाळेस प्रथम क्रमांक



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** परभणी जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी, नतिषा माथुर मॅडम यांच्या संकल्पनेतून, जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी वर्ड चॅम्पियन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा वर्ग तीन ते पाच, सहा ते आठ व नव ते दहा अशा तीन गटात घेण्यात येत आहे. ही स्पर्धा शाळा स्तर,केंद्र स्तर,तालुका स्तर व जिल्हा स्तर अशी घेण्यात येणार आहे.केहाळ केंद्राची केंद्रस्तरीय वर्ड चॅम्पियन स्पर्धा काल दिनांक ९ मार्च २०२६ रोजी,केंद्रप्रमुख तथा येलदरी बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी श्री के. सी घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा सावंगी माळसा या ठिकाणी घेण्यात आली. केंद्रातील तेरा शाळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला. या स्पर्धेसाठी केंद्रस्तरीय नोडल अधिकारी म्हणून श्री सिद्धेश्वर मुंडे यांनी काम पाहिले त्यांना सुलभक म्हणून डॉक्टर नंदकुमार ढोके, तुकाराम काळे, तुळशीराम कानडे व संतोष चिभडे सर या शिक्षकांनी सहकार्य केले.या स्पर्धेतून तीन ते पाच गटातून विजयनगर तांडा येथील शाळेने प्रथम क्रमांक पटकावला,सहा ते आठ गटातून केंद्रीय प्राथमिक शाळा केहाळ या शाळेने प्रथम क्रमांक पटकावल व नऊ ते दहा या गटातून प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली. या सर्व विद्यार्थ्यांना मुरूमखेडा येथील सरपंच प्रमोदराव माकोडे,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री भागवत कापुरे, रविंद्र चव्हाण, एजाज शेख,अन्सार पठाण,प्रवीण भिसे,प्रवीण स्वामी यांच्या वतीने रोख बक्षिसे देण्यात आली व या विद्यार्थ्यांना तालुकास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या स्पर्धेसाठी केंद्रातील सर्व मुख्याध्यापक शिक्षक यांनी परिश्रम घेतले.

## फुल स्टॅक वेब डेव्हलपमेंट" इंटर्नशिपचा उत्साहात समारोप संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयाच्या बीसीए विभागामार्फत १८ फेब्रुवारी ते ९ मार्च २०२६ या कालावधीत नेटलीप आयटी कंपनीच्या सहकार्याने "फुल स्टॅक वेब डेव्हलपमेंट" या विषयावर १५ दिवसांची इंटर्नशिप व शॉर्ट टर्म कोर्स आयोजित करण्यात आला होता. या इंटर्नशिपचा समारोप समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनीता बाजपेयी मॅडम होत्या, तर आयटी क्षेत्रातील तज्ज्ञ श्रीमती स्नेहल कुलथे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाला बीसीए विभाग प्रमुख प्रा. अंजली उमाळकर मॅडम तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रितु ठाकुर यांनी केले. इंटर्नशिपदरम्यान झालेल्या प्रत्येक दिवसाच्या प्रशिक्षणाचा आढावा प्रा. माधुरी मुत्याल यांनी सविस्तरपणे मांडला.या इंटर्नशिपच्या माध्यमातून विद्यार्थिनींना आयटी कंपनीमध्ये प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव मिळाला तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक ज्ञानही प्राप्त झाले. १५ दिवसांच्या प्रशिक्षणामध्ये विद्यार्थिनींना वेब डेव्हलपमेंटचे विविध टप्पे शिकविण्यात आले. या प्रशिक्षणासाठी कंपनीचे ट्रेनर श्रीधर बोकिल, शुभम काकडे व कोमल बोरनारे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.प्रमुख पाहुण्या श्रीमती स्नेहल कुलथे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना इंटर्नशिपचे महत्त्व स्पष्ट केले आणि आयटी क्षेत्रातील विविध करिअर संधींबाबत माहिती दिली. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्या डॉ. सुनीता बाजपेयी यांनी विद्यार्थिनींना उज्ज्वल भविष्यासाठी व आत्मनिर्भरतेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी कंपनीतर्फे इंटर्नशिप व शॉर्ट टर्म कोर्स यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या विद्यार्थिनींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच उत्कृष्ट प्रोजेक्ट सादर करणाऱ्या तीन विद्यार्थिनींना कंपनीतर्फे विशेष बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. तेजा दीक्षित यांनी आभार प्रदर्शन केले.

## महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागर यांची बीडमध्ये बैठक



**बीड (भगवंत पाळवदे) :** दि. 11 : महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) शेरसिंग रुक्कानसिंह डागोर यांनी बीड येथे भेट देत सफाई कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती प्रक्रियेचा तसेच त्यांच्या प्रलंबित प्रश्नांचा आढावा घेतला.जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषद बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, पोलिस उपअधीक्षक, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, शिक्षणाधिकारी तसेच नगरपरिषद प्रशासन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.बैठकीत लाड पागे समितीच्या शिफारशींनुसार सफाई कामगारांच्या नियुक्तीबाबत चर्चा करण्यात आली. तसेच सफाई कामगारांच्या पदोन्नती, वेतनवाढ, सेवा अटी, रजा रोखीकरण आदी मुद्द्यांवरही सविस्तर आढावा घेण्यात आला.सफाई कर्मचाऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या श्रमसाफल्य आवास योजना, सफाई मित्र सुरक्षा अभियान यांसारख्या योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना मिळावा, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायतींमध्ये सफाई कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांचा आढावा घेऊन भरती प्रक्रियेबाबत पुढील कार्यवाही करण्याबाबतही चर्चा करण्यात आली. सफाई कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी शासन कटिबद्ध असून त्यांच्या समस्या तातडीने सोडविण्यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करावे, असे निर्देश यावेळी देण्यात आले.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १२ मार्च २०२६

# सध्याच्या काळातील गुरु (प्राध्यापक) आणि विद्यार्थी : बदलते वास्तव

**भा**रतीय संस्कृतीमध्ये गुरुचे स्थान अत्यंत पवित्र आणि महान मानले गेले आहे. प्राचीन काळापासून गुरु हे ज्ञानाचे, संस्कारांचे आणि मार्गदर्शनाचे केंद्र मानले जात होते. "गुरुशिवाय ज्ञान नाही" अशी धारणा समाजात दृढ होती. गुरुकुल पद्धतीत गुरु आणि शिष्य यांचे नाते हे विश्वास, आदर आणि समर्पण यांवर आधारित होते. गुरु विद्यार्थ्यांना केवळ शिक्षण देत नसत, तर त्यांना जीवन जगण्याची योग्य दिशा देत असत. त्यामुळे समाजात गुरुचा मान अत्यंत उच्च होता. परंतु सध्याच्या काळात हे गुरु-विद्यार्थी नाते अनेक ठिकाणी बदलताना दिसत आहे. काही महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्यातील विश्वास कमी होत असून शिक्षणक्षेत्रात विविध समस्या निर्माण होताना दिसतात.आजच्या काळात अनेक महाविद्यालयांमध्ये शिक्षणाबरोबरच राजकारणाचा प्रभाव वाढलेला दिसतो. काही प्राध्यापक स्वतःच्या पद, प्रतिष्ठा किंवा वैयक्तिक फायद्यासाठी राजकारणात गुंतलेले असतात, अशी चर्चा विद्यार्थ्यांमध्ये वारंवार ऐकायला मिळते. त्यामुळे शिक्षणाचे मूळ उद्दिष्ट मागे पडते. वर्गात विद्यार्थ्यांना विषय समजावून सांगण्यापेक्षा काही ठिकाणी गटबाजी, पक्षपातीपणा किंवा वैयक्तिक स्वार्थ यांना जास्त महत्त्व दिले जाते. परिणामी विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षणाविषयी निराशा निर्माण होते.याशिवाय काही ठिकाणी जात, ओळख किंवा वैयक्तिक संबंध यांवरून विद्यार्थ्यांशी वेगळा व्यवहार केला जातो, अशीही तक्रार ऐकायला मिळते. शिक्षण हे समानतेवर आधारित असले पाहिजे; परंतु जर विद्यार्थ्यांशी भेदभाव केला गेला तर त्याचा त्यांच्या मनावर खोल परिणाम होतो. उदाहरणार्थ, एखादा विद्यार्थी अभ्यासात हुशार असला तरी त्याला योग्य प्रोत्साहन मिळत नाही, तर दुसऱ्या विद्यार्थ्याला ओळखीमुळे अधिक संधी मिळतात, अशी परिस्थिती निर्माण झाली तर विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास कमी होतो. अशा घटनांमुळे शिक्षणव्यवस्थेची विश्वासार्हता कमी होण्याचा धोका निर्माण होतो.काही विद्यार्थ्यांच्या अनुभवांमध्ये असेही दिसते की प्रकल्प, अंतर्गत गुण किंवा शिफारशी यांसाठी प्राध्यापकांशी जवळीक ठेवण्याची गरज भासते. जर एखादा विद्यार्थी स्पष्टपणे आपले मत मांडतो किंवा अन्यायाविरुद्ध आवाज उठवतो, तर त्याला कधी कधी अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे अनेक विद्यार्थी शांत राहणे पसंत करतात. या परिस्थितीमुळे महाविद्यालयातील वातावरण निरोगी न राहता तणावपूर्ण बनते.याचे एक उदाहरण विचारात घेता येईल. एखाद्या महाविद्यालयात दोन विद्यार्थी समान प्रकल्प सादर करतात. त्यापैकी एक विद्यार्थी मेहनतीने काम केलेला असतो, तर दुसरा विद्यार्थी एखाद्या गटाशी जवळीक असल्यामुळे त्याला जास्त गुण मिळतात. अशा वेळी मेहनत करणाऱ्या विद्यार्थ्याला अन्याय झाल्याची भावना निर्माण होते. तो पुढे मेहनत करण्याऐवजी निराश होऊ शकतो. ही परिस्थिती केवळ एका विद्यार्थ्यापुरती मर्यादित राहत नाही, तर इतर विद्यार्थ्यांवरही त्याचा परिणाम होतो.दुसरीकडे, विद्यार्थ्यांमध्येही काही बदल दिसून येतात. आजच्या डिजिटल युगात अनेक विद्यार्थी मोबाईल, सोशल मीडिया किंवा इतर मनोरंजनाच्या साधनांमध्ये अधिक गुंतलेले दिसतात. अभ्यासाकडे लक्ष कमी देणे, वर्गात कमी उपस्थिती ठेवणे किंवा शिस्त न पाळणे या समस्या काही ठिकाणी दिसतात. त्यामुळे शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील संवाद कमी होत जातो. जेव्हा दोन्ही बाजूंनी विश्वास आणि आदर कमी होतो, तेव्हा शिक्षणाची गुणवत्ता देखील कमी होण्याची शक्यता असते.सध्याच्या काळात शिक्षणाचे व्यापारीकरण हीदेखील एक गंभीर समस्या बनली आहे. अनेक ठिकाणी शिक्षणाला सेवा म्हणून न पाहता व्यवसाय म्हणून पाहिले जाते. त्यामुळे काही वेळा ज्ञान देण्यापेक्षा निकाल, प्रसिद्धी किंवा आर्थिक लाभ यांना अधिक महत्त्व दिले जाते. अशा परिस्थितीत शिक्षकाचे आदर्श व्यक्तिमत्त्व मागे पडण्याचा धोका निर्माण होतो.तथापि, या सर्व टीकात्मक परिस्थिती असूनही संपूर्ण शिक्षणव्यवस्था नकारात्मक आहे असे म्हणणे योग्य ठरणार नाही. आजही अनेक प्रामाणिक, मेहनती आणि विद्यार्थ्यांसाठी समर्पित प्राध्यापक समाजात कार्यरत आहेत. ते विद्यार्थ्यांना केवळ विषय शिकवत नाहीत, तर त्यांना योग्य मार्गदर्शन देऊन त्यांचे आयुष्य घडवण्याचा प्रयत्न करतात. अनेक विद्यार्थ्यांच्या यशामागे अशा शिक्षकांचे मोठे योगदान असते. उदाहरणार्थ, एखादा प्राध्यापक गरीब विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती मिळवून देतो किंवा त्याला स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन करतो, तर त्या विद्यार्थ्याचे आयुष्य बदलू शकते. अशा उदाहरणांमुळे आजही समाजात गुरुचे महत्त्व कायम आहे.म्हणूनच या परिस्थितीकडे केवळ दोषारोपांच्या दृष्टीने न पाहता सुधारण्याच्या दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. प्राध्यापकांनी आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवून विद्यार्थ्यांशी समानतेने आणि प्रामाणिकपणे वागले पाहिजे. शिक्षणक्षेत्रात राजकारण किंवा भेदभाव यांना स्थान नसावे. दुसरीकडे विद्यार्थ्यांनीही शिक्षकांचा आदर राखून प्रामाणिकपणे अभ्यास करणे आणि शिस्त पाळणे गरजेचे आहे.शेवटी असे म्हणता येईल की गुरु आणि विद्यार्थी हे शिक्षणव्यवस्थेचे दोन महत्त्वाचे स्तंभ आहेत. जर या दोघांमधील विश्वास, आदर आणि संवाद मजबूत राहिला, तर शिक्षणाची गुणवत्ता निश्चितच वाढेल. परंतु जर स्वार्थ, भेदभाव आणि राजकारण यांचा प्रभाव वाढत गेला, तर समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक असलेली शिक्षणव्यवस्था कमकुवत होऊ शकते. त्यामुळे सध्याच्या काळात गुरु आणि विद्यार्थी या दोघांनीही आत्मपरीक्षण करून शिक्षणाला पुन्हा आदर्श आणि प्रेरणादायी बनवण्याचा प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे.



**लेखक प्रा. डॉ नामदेव वैजनाथ कचरे**
भूगोलशास्त्र विभाग
डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

# श्रीकृष्ण महाविद्यालयात शाश्वत विकासासाठी जैविक विज्ञान हे दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र यशस्वीपणे संपन्न



**उमरगा :( प्रा. नागसेन कांबळे)** तालुक्यातील श्रीकृष्ण महाविद्यालय गुंजोटी येथे "शाश्वत विकासासाठी जैविक विज्ञानातील अलीकडील ट्रेंड" या विषयावर प्राणीशास्त्र विभाग व वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या राष्ट्रीय पातळीवरच्या दोन दिवसीय परिसंवादाचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. दिनांक 06/03/2026 ते 07/03/2026 असे दोन दिवस दिवस यशस्वीपणे पार पडलेल्या या संशोधन संमेलनात अनेक दूरवरच्या परिसरातून संशोधक, प्राध्यापक विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. पहिल्या दिवशी या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. अरविंद धाबे यांच्या हस्ते पार पडले. या चर्चासत्रात शंभरच्या वर अनेक संशोधकांनी आपला सहभाग नोंदवून " RECENT TRENDS IN BIOLOGICAL SCIENCE FOR SUSTAINABLE DEVELOPMENT २०२६" या विषयाच्या अनुषंगाने आपले शोधनिबंध सादर केले. या राष्ट्रीय चर्चासत्रात दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील प्रा.डॉ. अरुण खरात ,कलबुर्गी येथील प्रा.डॉ.जी.एम. विद्यासागर ,पुणे येथील प्रा.डॉ.सी.जी .हिवरे, गुलबर्गा विद्यापीठातील प्रा.डॉ.के .विजयकुमार ,कळंब येथील प्रा.डॉ.हेमंत भगवान, नळदुर्ग येथील प्रा. डॉ.उद्धव भाले ,लातूर येथील प्रा.व्हि.के .भामरे आणि जालना येथील प्रा.डॉ. लक्ष्मीकांत शिंदे तसेच प्रा.डॉ. राजेंद्र काकडे यांनी विशेष सहभाग नोंदवला. विशेषतः प्रा.डॉ.लक्ष्मीकांत शिंदे यांनी आपल्या अभ्यासपूर्ण शोधनिबंधातून सर्वांचे लक्ष वेधून घेतले." EFFECTIVE MANAGEMENT OF DEADLIEST : MOSQUITO" या विषयाच्या अनुषंगाने मानवी जीवनास प्राणघातक असलेल्या व नसलेल्या पण अनेकदा मृत्यूलाही जबाबदार असलेल्या डासांच्या (मच्छर)प्रभावी निर्मूलनासाठी व व्यवस्थापनासाठी कोणकोणत्या प्रभावी व्यवस्थापन आणि दृष्टिकोनाची गरज आहे याची अभ्यासपूर्ण मांडणी करून ,स्वतः सिद्ध केलेले वैशिष्ट्यपूर्ण संशोधन सर्वांच्या समोर ठेवले. वैज्ञानिक देखरेख ,सामुदायिक कृती आणि नियंत्रण पद्धती (जसे की जैविक ,रासायनिक आणि पर्यावरणीय ) पद्धती एकत्रित करून डासांचे जीवनचक्र व्यत्यय आणता येते. डास अनेक पारंपरिक कीटकनाशकांना प्रतिरोधक बनले आहेत .त्यामुळे शाश्वत, दीर्घकालीन नियंत्रणासाठी बहुआयामी अशा अनेक विद्याशाखांच्या संशोधनाची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली .हे कोणत्याही एका विद्याशाखेचे काम नसून ते सर्वांचेच काम आहे .शाश्वत विकास ही जैविक विज्ञानापूरती संकुचित संकल्पना नसून ती व्यापक संकल्पना आहे ,हे आपण आवर्जून लक्षात घेतले पाहिजे.याशिवाय प्रा. डॉ. उद्धव भाले यांनी "LANDSCAPE GARDENING: REVENUE AND JOB OPPORTUNITIES" या विषयावर संशोधनपर मांडणी करताना वाढत्या खर्चाच्या उत्पन्नामुळे शहरीकरणामुळे आणि शाश्वत हिरव्या आणि सौंदर्यात्मक बाह्य जगाकडे होणाऱ्या बदलामुळे लँडस्केप बांधकाम व उच्च महसूल व्यवसायाच्या संधी आणि वैविध्यपूर्ण वाढत्या नोकरीच्या संधीचे एक मजबूत दालन समृद्ध करते. या क्षेत्रात निवासी व्यावसायिक आणि सार्वजनिक प्रकल्पासाठी हिरव्या क्षेत्राची संरचना ,निर्मिती आणि देखभाल यांचा समावेश करता येते ,असे सांगितले. बागेची रचना आणि स्थापना, महसूल निर्मितीच्या संधी, पर्यावरण पूरक, संद्रिय लँडस्केपिंग ,सिंचन सेवा, बागायती उत्पादने, उच्च दर्जाची डिझाइन आणि बांधकाम, लँडस्केपिंग आणि बागकामात नोकरीच्या संधी, शाश्वततेचा ट्रेंड ,शहरीकरण, तांत्रिक एकत्रीकरण, जीवनशैलीतील सुधारणा, या व अशा विविध घटकांच्या अनुषंगाने ही प्रा.डॉ.उद्धव भाले यांनी इत्यंभूत आणि प्रदीर्घ अशी मांडणी केली. याशिवाय तदनुषंगिक अनेक विषयावर अनेक संशोधक व संशोधक विद्यार्थ्यांनी आपले शोधनिबंध सादर केले.त्यामुळे प्रश्नोत्तराचा तास एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवला.मुख्य विषयाच्या संकल्पनेभोवती विविध विषय, विविध शैलीत आणि विविध प्राध्यापक,विद्यार्थी आणि संशोधकाच्या मंदियाळीत हे चर्चासत्र एकूण सात सत्रामध्ये मध्ये यशस्वीपणे पार पडले. हे चर्चासत्र यशस्वी करण्यासाठी या चर्चासत्राचे आयोजक श्रीकृष्ण महाविद्यालयाचे प्राचार्य सर्वश्री डॉ.गुलाब राठोड, संयोजक प्रा.डॉ. दस्तगीर पठाण, प्रा. डॉ. डी.पी. चव्हाण, प्रा.डॉ.सुनील पतंगे, प्रा. डॉ. राम कदम ,प्रा.डॉ. किसन लोहार,प्रा. डॉ. विलास होगाडे ,प्रा.डॉ. योगीराज विजापुरे, प्रा. डॉ. भाऊसाहेब उगले,प्रा. डॉ. रमेश मादळे ,प्रा.डॉ.मल्लमा आंभुसे आणि प्रा.आय.एस. इनामदार यांनी अविश्रांत परिश्रम घेऊन चर्चासत्र यशस्वी केले.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १२ मार्च २०२६

# यशवंतराव चव्हाण : आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार

12 मार्च हा दिवस महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या दिवशी आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, दूरदर्शी नेते, कुशल प्रशासक आणि लोकाभिमुख विचारवंत म्हणून ओळखले जाणारे यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी केली जाते. महाराष्ट्राच्या घडणीत ज्यांचे योगदान अनन्यसाधारण आहे अशा या नेत्याचे कार्य केवळ राजकारणापुरते मर्यादित नव्हते; तर शिक्षण, सहकार, उद्योग, संस्कृती, साहित्य, संरक्षण व्यवस्था, ग्रामीण विकास आणि लोकशाही मूल्यांच्या जपणुकीपर्यंत त्यांचा प्रभाव व्यापक होता. यशवंतराव चव्हाण हे केवळ एका राज्याचे मुख्यमंत्री किंवा देशाचे संरक्षणमंत्री नव्हते, तर ते एक व्यापक दृष्टी असलेले राष्ट्रनेते होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दूरदृष्टी, प्रगल्भता, व्यवहारज्ञान, समन्वयाची वृत्ती आणि लोकहिताची प्रामाणिक बांधिलकी यांचा सुंदर संगम दिसून येतो. म्हणूनच महाराष्ट्राच्या सामाजिक-राजकीय इतिहासात त्यांचे नाव अत्यंत आदराने आणि अभिमानाने घेतले जाते.यशवंतराव चव्हाण यांचा जन्म 12 मार्च 1913 रोजी त्यांच्या आजोळी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या गावात एका सामान्य कुटुंबात झाला. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर देवराष्ट्रे हे गाव सांगली जिल्ह्यामध्ये समाविष्ट करण्यात आले. त्यांच्या वडिलांचे नाव बळवंतराव चव्हाण तर आईचे नाव विठाबाई होते. यशवंतराव लहान असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले आणि घराची संपूर्ण जबाबदारी त्यांच्या आईवर आली. विठाबाई या अत्यंत कष्टाळू, स्वाभिमानी आणि दूरदर्शी स्त्री होत्या. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मुलाच्या शिक्षणासाठी अथक प्रयत्न केले. आईच्या संस्कारांचा यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वावर खोल परिणाम झाला. आईकडून त्यांना परिश्रम, प्रामाणिकपणा, स्वाभिमान आणि समाजासाठी काम करण्याची प्रेरणा मिळाली. ग्रामीण वातावरणात वाढलेल्या यशवंतरावांना बालपणापासूनच शेतकरी आणि सामान्य लोकांच्या समस्या जवळून पाहायला मिळाल्या. त्यामुळे पुढे राजकारणात आल्यावर त्यांनी ग्रामीण विकासाला विशेष प्राधान्य दिले.त्यांचे प्राथमिक शिक्षण कराड येथे झाले. पुढे त्यांनी कोल्हापूर आणि पुणे येथे उच्च शिक्षण घेतले. शिक्षणाच्या काळातच त्यांच्यावर राष्ट्रवादी विचारांचा प्रभाव पडू लागला. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, पंडित जवाहरलाल नेहरू यांसारख्या राष्ट्रीय नेत्यांच्या विचारांनी ते प्रभावित झाले. स्वातंत्र्य चळवळीच्या वातावरणामुळे त्यांच्यात देशभक्तीची भावना जागृत झाली. त्यामुळे त्यांनी विद्यार्थी अवस्थेतच स्वातंत्र्य आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. 1930 च्या सविनय कायदेभंग आंदोलनात त्यांनी भाग घेतला आणि त्यासाठी त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला. तुरुंगवासाच्या काळात त्यांनी अनेक राष्ट्रीय नेत्यांच्या सहवासातून राजकारण, समाजकारण आणि राष्ट्रनिर्मितीचे धडे घेतले. याच काळात त्यांची विचारसरणी अधिक प्रगल्भ झाली.स्वातंत्र्यपूर्व काळात यशवंतराव चव्हाण यांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय काम सुरू केले. त्यांनी शेतकरी, कामगार आणि दुर्बल घटकांच्या प्रश्नांकडे विशेष लक्ष दिले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताच्या पुनर्निर्माणाच्या प्रक्रियेत त्यांनी सक्रिय भूमिका बजावली. 1950 च्या दशकात ते महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाचे महत्त्वाचे नेते म्हणून उदयास आले. त्यांची कार्यक्षमता, संघटन कौशल्य आणि समन्वयाची क्षमता पाहून त्यांना विविध जबाबदाऱ्या देण्यात आल्या. 1956 मध्ये ते द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले. त्या काळात राज्यात मराठी आणि गुजराती भाषिक लोकांमध्ये वेगळ्या राज्याच्या मागणीवरून आंदोलन सुरू होते. या अत्यंत गुंतागुंतीच्या परिस्थितीत त्यांनी संयम, समन्वय आणि दूरदृष्टी दाखवून परिस्थिती हाताळली.1960 साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री झाले. आधुनिक महाराष्ट्राच्या घडणीत त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, सहकार, उद्योग, शेती, पायाभूत सुविधा आणि सांस्कृतिक विकास यावर विशेष भर दिला. त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात सहकार चळवळीला मोठी चालना मिळाली. सहकारी साखर कारखाने, सहकारी बँका, सहकारी दूध संघ यांसारख्या संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. सहकाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक बळ मिळावे आणि ग्रामीण भागाचा विकास व्हावा हा त्यामागचा मूलभूत उद्देश होता. आज महाराष्ट्र सहकार क्षेत्रात अग्रगण्य राज्य म्हणून ओळखला जातो, त्यामागे यशवंतराव चव्हाण यांचे दूरदर्शी नेतृत्व मोठ्या प्रमाणावर कारणीभूत आहे.शिक्षण क्षेत्रातही त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी त्यांनी महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले. "शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे" या विचारावर त्यांचा दृढ विश्वास होता. त्यामुळे त्यांनी शिक्षणाचा प्रसार आणि गुणवत्ता यावर भर दिला. त्यांच्या काळात महाराष्ट्रात अनेक विद्यापीठे, महाविद्यालये आणि संशोधन संस्था उभारल्या गेल्या. आज महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्राची भक्कम पायाभरणी ही त्यांच्या दूरदर्शी धोरणांमुळे झाल्याचे मानले जाते.कृषी आणि ग्रामीण विकासाच्या क्षेत्रातही त्यांनी महत्त्वपूर्ण काम केले. शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेऊन त्यांच्या उत्पादनाला बाजारपेठ उपलब्ध करून देणे, सिंचन सुविधा वाढवणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर प्रोत्साहित करणे यावर त्यांनी भर दिला. ग्रामीण भागात रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य सेवा आणि शिक्षण सुविधा वाढवण्याचे प्रयत्न त्यांनी केले. त्यांच्या धोरणांमुळे ग्रामीण महाराष्ट्रात विकासाची प्रक्रिया वेगाने सुरू झाली.यशवंतराव चव्हाण यांचे राष्ट्रीय पातळीवरील योगदानही अत्यंत महत्त्वाचे आहे. 1962 साली भारत-चीन युद्धानंतर देशाच्या संरक्षण व्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. त्या अत्यंत कठीण काळात त्यांना भारताचे संरक्षणमंत्री म्हणून जबाबदारी देण्यात आली. त्यांनी भारतीय सैन्याचे पुनर्रचना, आधुनिकीकरण आणि बळकटीकरण यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्यांच्या नेतृत्वाखाली संरक्षण व्यवस्थेत अनेक सुधारणा करण्यात आल्या. त्यामुळे भारतीय सैन्य अधिक सक्षम आणि सक्षम बनले. त्यांच्या कार्यामुळे देशाच्या संरक्षण व्यवस्थेला नवे बळ मिळाले.पुढे त्यांनी वित्तमंत्री, परराष्ट्रमंत्री आणि गृहमंत्री अशा अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केले. प्रत्येक पदावर त्यांनी प्रामाणिकपणे आणि दूरदृष्टीने काम केले. राष्ट्रीय एकात्मता, आर्थिक विकास आणि लोकशाही मूल्यांचे रक्षण यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. ते अत्यंत अभ्यासू आणि विचारशील नेते होते. कोणताही निर्णय घेताना ते विविध पैलूंचा सखोल विचार करत असत. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वावर सर्वच स्तरांतील लोकांचा विश्वास होता.यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्त्व केवळ राजकीय नेते म्हणून मर्यादित नव्हते. ते साहित्य, संस्कृती आणि बौद्धिक चर्चांमध्येही रस घेणारे विचारवंत होते. त्यांना वाचनाची आणि लेखनाची विशेष आवड होती. त्यांनी अनेक पुस्तके आणि लेख लिहिले. त्यांच्या लेखनातून समाज, राजकारण आणि संस्कृती याबद्दलचे सखोल चिंतन दिसून येते. "कृष्णाकाठ", "सह्याद्रीचे वारे" यांसारख्या त्यांच्या साहित्यकृतींना विशेष लोकप्रियता मिळाली. त्यांच्या लेखनात ग्रामीण जीवन, सामाजिक वास्तव आणि मानवी मूल्यांचे सुंदर चित्रण आढळते.सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा त्यांना अभिमान होता. साहित्य, कला, नाटक, संगीत यांसारख्या क्षेत्रांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी अनेक उपक्रम राबवले. विविध सांस्कृतिक संस्था आणि साहित्य संमेलनांना त्यांनी पाठिंबा दिला. त्यामुळे महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवन अधिक समृद्ध झाले.यशवंतराव चव्हाण यांचे नेतृत्व समन्वयवादी आणि लोकाभिमुख होते. विविध मतप्रवाह आणि विचारसरणी असलेल्या लोकांना एकत्र आणून सामूहिक निर्णय घेण्याची त्यांची क्षमता विलक्षण होती. ते संवादावर विश्वास ठेवणारे नेते होते. मतभेद असले तरी संवादातून मार्ग काढण्याची त्यांची पद्धत होती. त्यामुळे ते सर्वांना आपलेसे वाटणारे नेता बनले.त्यांच्या राजकीय कारकिर्दीत अनेक आव्हाने आणि संघर्ष आले, परंतु त्यांनी प्रत्येक संकटाचा धैर्याने सामना केला. त्यांची कार्यपद्धती संयमी, व्यावहारिक आणि दूरदर्शी होती. त्यामुळे ते महाराष्ट्राच्या राजकारणात स्थिरता आणि विकासाचे प्रतीक बनले.आजच्या काळात त्यांच्या विचारांची आणि कार्याची प्रासंगिकता अधिक जाणवते. सामाजिक समता, ग्रामीण विकास, शिक्षणाचा प्रसार, लोकशाही मूल्यांची जपणूक आणि राष्ट्रीय एकात्मता या बाबी आजही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या कार्यातून या मूल्यांचे जतन आणि संवर्धन केले. त्यामुळे त्यांचे जीवन आणि कार्य आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरते.12 मार्च रोजी त्यांची जयंती साजरी करताना आपण त्यांच्या कार्याची आणि विचारांची आठवण काढतो. त्यांच्या जीवनातून आपल्याला कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा, लोकसेवा आणि राष्ट्रभक्ती यांचे धडे मिळतात. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी दूरदृष्टी, समन्वय आणि लोकहिताची बांधिलकी आवश्यक असते, हे त्यांच्या कार्यातून स्पष्ट होते.आज महाराष्ट्राच्या सामाजिक-आर्थिक प्रगतीकडे पाहिले असता यशवंतराव चव्हाण यांच्या दूरदर्शी नेतृत्वाची जाणीव प्रकर्षाने होते. सहकार चळवळ, शिक्षणाचा प्रसार, औद्योगिक विकास, सांस्कृतिक समृद्धी आणि लोकशाही मूल्यांची जपणूक या सर्व क्षेत्रांत त्यांनी घातलेली पायाभरणी आजही महाराष्ट्राच्या विकासाचा मजबूत आधार आहे.म्हणूनच यशवंतराव चव्हाण यांना "आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार" असे संबोधले जाते. त्यांनी आपल्या दूरदृष्टीने आणि नेतृत्वगुणांनी महाराष्ट्राला विकासाच्या नव्या मार्गावर नेले. त्यांचे जीवन आणि कार्य हे केवळ इतिहासाचा भाग नसून ते आजही समाजासाठी मार्गदर्शक आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या विचारांचे स्मरण करून समाजाच्या प्रगतीसाठी आणि लोकशाही मूल्यांच्या जपणुकीसाठी कार्य करण्याचा संकल्प केला पाहिजे.अशा या महान नेत्याच्या कार्याला आणि विचारांना विनम्र अभिवादन करूनच त्यांच्या जयंतीचे खरे औचित्य साध्य होईल.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),
bagate.rajendra५@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १२ मार्च २०२६

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १२ मार्च २०२६